
# १०. गोमू माहेरला जाते



• **ऐका. वाचा. म्हणा.**

गोमू माहेरला जाते हो नाखवा ।
तिच्या घोवाला कोकण दाखवा ।।


दावा कोकणची निळी निळी खाडी
दोन्ही तीराला हिरवी हिरवी झाडी
भगवा अबोली फुलांचा ताटवा ।।१।।

कोकणची माणसं साधी भोळी
काळजात त्यांच्या भरली शहाळी
उंची माडांची जवळून मापवा ।।२।।

सोडून दे रे खोड्या साऱ्या
शिडात शीर रे अवखळ वाऱ्या
झणी धरणीला गलबत टेकवा ।।३।।

**ग. दि. माडगूळकर** (१९१९-१९७७) : प्रसिद्ध कवी, लेखक, पटकथालेखक, कादंबरीकार, 'गीतरामायणकार'. 'जोगिया', 'चैत्रबन', 'वैशाखी', 'पूरिया' इत्यादी गीतसंग्रह; 'गीतगोपाल', 'गीतसौभद्र' ही काव्यनिर्मिती; 'कृष्णाची करंगळी', 'तुपाचा नंदादीप' हे कथासंग्रह; 'आकाशाची फळे', 'उभे धागे आडवे धागे' या कादंबऱ्या प्रसिद्ध.

कोकण, कोकणातील खाडी, तेथील निसर्गसौंदर्य, कोकणातील साधी भोळी माणसे यांचे सुरेख वर्णन प्रस्तुत गीतात कवीने केले आहे.



## स्वाध्याय

**प्र. १. खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे तक्ता पूर्ण करा.**

| कवितेचे कवी | कवितेचा विषय | कवितेतील पात्र | कवितेत वर्णन केलेल्या गोष्टी |
|---|---|---|---|
| | | | |

**प्र. २. एका शब्दात उत्तरे लिहा.**

(अ) गोमूचे माहेर–

(आ) कोकणची माणसं–

**प्र. ३. खालील आकृती पूर्ण करा.**

(अ) कोकणची वैशिष्ट्ये

(आ) खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(अ) काळजात त्यांच्या भरली शहाळी →

(आ) झणी धरणीला गलबत टेकवा →

**प्र. ४. कवीने वाऱ्याला केलेल्या विनंतीचा अर्थ तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**



### चर्चा करूया.

- **शहाळ्यातले पाणी आरोग्यदायी असते, याबाबत शिक्षक व पालकांशी चर्चा करा.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा.**

(१) नाखवा (३) भोळी

(२) खाडी (४) साऱ्या

**(आ) खालील शब्दांचे तुम्हांला माहीत असणारे अर्थ लिहा.**

(१) शीड (२) माड (३) खाडी (४) शहाळी (५) झणी (६) गलबत



## विचार करा. सांगा.

- तुमच्या घरी आलेल्या पाहुण्यांना तुम्ही तुमच्या गावातील कोणकोणती स्थळे दाखवाल, त्या स्थळांचे थोडक्यात वर्णन करा.

## माहिती मिळवूया.



- आपल्या देशातील कोणकोणत्या राज्यांना समुद्रकिनारा लाभला आहे, त्या राज्यांच्या नावांची माहिती आंतरजालावरून मिळवा व नोंद करा.
- आपल्या राज्यातील कोणकोणत्या शहरांना, गावांना समुद्रकिनारा लाभला आहे, त्या गावांच्या, शहरांच्या नावांची माहिती आंतरजालावरून मिळवा व नोंद करा.

## आपण समजून घेऊया.

- खालील परिच्छेद वाचा.

नंदा आणि आई मंडईत पोहोचल्या अन् पावसाची रिमझिम सुरू झाली. आई नंदाला म्हणाली, ''तू कांदे, बटाटे व लसूण घे, तोपर्यंत मी भाजीपाला घेते.'' आईने भाजीपाला खरेदी केला, शिवाय फळेही घेतली. नंदाने आईला विचारले, ''आई, लसूण घेऊ की आले घेऊ?'' आई म्हणाली, ''दोन्ही घे; पण लवकर आवर, कारण जोराचा पाऊस सुरू होईल. पाऊस आला, तर आपण भिजू; म्हणून तुला 'घाई कर' असं सांगते आहे.'' नंदा म्हणाली, ''कशाला एवढी चिंता करतेस? आपण रिक्षा किंवा बसने घरी जाऊ, म्हणजे आपण पावसात भिजणार नाही.''

वरील परिच्छेदातील अधोरेखित शब्द दोन वा अधिक शब्दांना किंवा दोन वा अधिक वाक्यांना जोडण्याचे काम करतात, म्हणून या शब्दांना **उभयान्वयी अव्यये** म्हणतात.

'उभय' या शब्दाचा अर्थ **दोन** व 'अन्वय' या शब्दाचा अर्थ **संबंध** असा आहे. दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांचा संबंध जोडणे, हे उभयान्वयी अव्ययाचे कार्य आहे. आणि, शिवाय, की, पण, अथवा, अन्, परंतु, नि हे सर्व शब्द **उभयान्वयी अव्यये** आहेत.

- खालील उभयान्वयी अव्ययांचा वाक्यांत उपयोग करा.

की, म्हणून, पण, परंतु, अथवा, म्हणजे

- खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये अधोरेखित करा.

(अ) सशाची आणि कासवाची पळण्याची शर्यत लागली.
(आ) आईने काटकसर केली; पण काही शिल्लक उरले नाही.
(इ) ती कलिंगड किंवा खरबूज आणणार आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना उभयान्वयी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा.

भाषेचा नमुना

## सामवेदी बोली

गावात झुजूकाका घारा पेपर यासॉ. तॉपान दोपारसॉ बारा वाजता. झुजूने पेपर उगडलॉ आन पेपरराशी काळ्या अक्षरात लिवीलेली हेडलाईन जोराय वाशीली. ‘वसईच्या पश्चिम किनारपट्टीवर स्कायलॅब पडणार.’ आत्ये या स्कायलॅबला पड्यादो वसयसॉ किनारॉ बरॉ दिखलॉ. पेपराशा या बातमीन्ये जकल्या गावाशे जकले घाभरे घुभरे झाले. स्कायलॅब पड्यासा आन आपून जकले मरॅशे. मग का? आत्ये रेल्यात तोड्ये दि धमाल करॉन घ्याऑ या कल्पनेने जकले मज्या करण्या कामाला लागले. लोकांना आजूबाजूला बग्यादो वेळूस नॉतो. जही जही १४ तारीख जवळ येतोती तही तही जकल्याई अवस्था घनी बिकट हॉत गेली. बबनशी गत पान तहीस होती. भाटात केळीऑ अंगाठो जरी मोडलो तरी त्याला वाट्यासा स्कायलॅब पडले हायदे आ? एकदासा चौदा जानेवारीओ दी उजाडलो. जॉहो उजाडलॉ तॉहो, तो मावळलॉ पान. पान स्कायलॅब पडताना कुनालास दिखला नाय; पान अजून रात बाकी होती. कहेबहे जिवणे आटपॉन लोक खाट्येऑर पडलॉता पान निज भगून कुना डॉळ्यात येत नॉती. रात आस्ते आस्ते पुड्ये सरकातोती. घड्याळाये काट्ये कय दिखात नॉते, पान त्याई टिकटीक जोराय आयकॉ येतोती. आन एकदम भॉठो आवाज जालॉ. बायारशा खांबोरसॉ दिऑ विजलॉ. लाईट गेली. काळॉकिट. बबनने हळूहळू डॉळे उगडले. समोर त्याला त्याई बय बारझाड करताना दिखली. समोर बय दिखलेऑर त्याला बरा वाटला. त्याने बयला हाक मारली. ‘बलो, स्कायलॅब आपल्यास घरोर पडला गा का?’ ‘रातसा कईस पडला नाय, पान पात्येराती शिशा झाड पडला.’

बरोबर साडेबारा टोल्याला पेपरवालॉ काका आलॉ. त्याने टाकीलॅलो पेपर झुजूने टुक्याशा अगोदर बबनने टुकीलॉ, आन पेपरातशी हेडलाईन जकल्याना आयको जायदे ऑड्या जोरात वाशीली. ‘काल सकाळी दहा वाजून १० मिनिटांनी स्कायलॅब अरबी समुद्रात कोसळले.’ क्षणभर जकला शांत जाला, आन जमलेल्या जकल्यांने एकदम जल्लोश केलॉ.

**सिरील मिनेझीस** (१९६५) : प्रसिद्ध लेखक. ‘धरायला गेलो एक’, ‘आभास’ इत्यादी मराठी एकांकिका; ‘मिंगॅरॅऽ ऽऽ’ हा कथासंग्रह प्रसिद्ध.

‘बबन’ या कथासंग्रहातून वरील उतारा घेतला आहे.

### शोध घेऊया.



- कोकणी बोलीभाषेत साहित्यलेखन करणाऱ्या विविध लेखक व कवींची माहिती मिळवा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना बोलीभाषेतील वरील उतारा योग्य उच्चारांसह वाचून दाखवावा. उताऱ्यातील शब्दांचे अर्थ व भाषेचे वेगळेपण समजावून सांगावे.